# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१९ जानेवारी,२०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १८/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, शेंगाव, ब्रम्हपुरी, तळोधी, पाथरी, सिंदेवाही, धाबा, विरूर, गोंडपिंपरी, चिमुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२५** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १० आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **२,४७,३००/–रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

# शेतातील पिकाची चोरी करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत फिर्यादीच्या शेतीतील मालाची चोरी करणाऱ्या आरोपीस १७/०१/२०१९ रोजी **श्री. छल्लानी, जेएमएफसी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत यातील फिर्यादी नामे दिलीप रामभाउ जांभुळे वय ३५ रा. तळोधी नाईक, यांनी आपल्या शेतात पिकविलेला चना काढुन मोठया डोलीमध्ये भरून ठेवलेला होता. दिनांक ०२/०४/२०१६ रोजी **अज्ञात चोराने** फिर्यादीने जपुन ठेवलेल्या डोलीतील चना त्यांना न सांगता काढुन नेला. यावरून पोलीस स्टेशन चिमुर येथे फिर्यादीच्या रिपोर्टवरून अप.क्र १०९/२०१६ कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोहवा. दिवाकर ढोक पोलीस स्टेशन चिमुर यांनी पुर्ण करून गुन्हयातील **आरोपी नामे अरविंद कामडी वय ३१ रा. तळोधी नाईक यास निष्पन्न करून** सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १७/०१/२०१९ रोजी **आरोपी नामे अरविंद कामडी वय ३१ रा. तळोधी नाईक, यास कलम ३८० भादंवि अन्वये ०३ महिने शिक्षा व २,०००/—रू दंडाची शिक्षा श्री. छल्लानी, जेएमएफसी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संजय आर. ठावरी, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. सुधाकर बुटके पोस्टे चिमुर यांनी काम पाहिले.

---

# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१९ जानेवारी,२०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)

## महिलेस शिवीगाळ करून मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत फिर्यादीस मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीस १७/०१/२०१९ रोजी **श्री. छल्लानी, जेएमएफसी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत दिनांक ०८/०२/२०१७ रोजी यातील फिर्यादी महिला आणि **आरोपी नामे चंद्रगुप्त रमेशराव मांडवकर वय २४ रा. चिमुर** यांच्यात आपापल्या व्यवसायामुळे वाद झाल्याने आरोपीने फिर्यादी महिलेस मी तुझी दुकान जाळुन टाकीण असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चिमुर येथे अप.क्र. ८२/२०१७ कलम ३९४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास नापोशि तुकाराम सोनुले पोलीस स्टेशन चिमुर यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १७/०१/२०१९ रोजी **आरोपी नामे चंद्रगुप्त रमेशराव मांडवकर वय २४ रा. चिमुर यास ०२ महिने १५ दिवस व १,५००/—रू दंड न भरल्यास १५ दिवस शिक्षा श्री. छल्लानी, जेएमएफसी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संजय आर. ठावरी, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. सुधाकर बुटके पोस्टे चिमुर यांनी काम पाहिले.

———————————————————————————————

# फिर्यादीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन बल्लारशाह अंतर्गत फिर्यादीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस १८/०१/२०१९ रोजी **श्री. गांधे, जेएमएफसी कोर्ट बल्लारशाह, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन बल्लारशाह अंतर्गत राहणारे यातील फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांना ओळखत असुन यातील **आरोपी नामे विनोद हरपती तिवारी वय ३५ रा. चुनाभट्टी बल्लारशााह याने** फिर्यादीस रात्रो दरम्यान पाणी मागण्याच्या बहाण्याने ती एकटी घरी असल्याचे पाहुन आरोपीने तिला हात लावुन तिचा विनयभंग केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. ३५/२०१५ कलम ३५४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोहवा. भिमराव तुराडे, पोलीस स्टेशन बल्लारशाह यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १८/०१/२०१९ रोजी **आरोपी नामे विनोद हरपती तिवारी वय ३५ रा. चुनाभट्टी बल्लारशााह, यास कलम ३५४ भादंवि मध्ये ०१ वर्ष कारावासाची शिक्षा व २,५००/—रू दंड न भरल्यास १ महिना शिक्षा श्री. गांधे, जेएमएफसी कोर्ट बल्लारशाह, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. कविता जगपती, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. अरविंद वाढई पोस्टे बल्लारशाह यांनी काम पाहिले.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

## अवैध दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपींना कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत अवैध दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीस १८/०१/२०१९ रोजी **श्री. शैलेश कंठे, जेएमएफसी कोर्ट भद्रावती, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन भद्रावती अंतर्गत हायवे रोडवर पोलीस पथक नाकेंबंदी करीत असतांना तपासणी दरम्यान एका ट्रकला थांबवुन विचारपुस करून झडती घेतली असता ट्रक मध्ये मोठया प्रमाणात दारूचा साठा मिळुन आला. चंद्रपुर जिल्हयात दारूबदी असुन सुध्दा दारूची वाहतुक करीत असतांना **आरोपी नामे १) विनय मधुकर लांजेवार वय ३८ रा. टेकानगर नागपुर, २) मनमोहन उर्फ मोनु रमेश शर्मा वय २१ रा. मयुर नगर नारी रोड नागपुर** हे मिळुन आल्याने फिर्यादी पोउपनि श्री. जितेंद्र वैरागडे यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप.क्र. ७४/२०१८ कलम ६५(ई) मुदाका सहकलम १८८, ४२०, ४६८, ४७१ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरिक्षक श्री. सुधाकर अंभोरे स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १८/०१/२०१९ रोजी **आरोपी नामे १) विनय मधुकर लांजेवार वय ३८ रा. टेकानगर नागपुर, २) मनमोहन उर्फ मोनु रमेश शर्मा वय २१ रा. मयुर नगर नारी रोड नागपुर यांना कलम ६५(ई) मुदाका मध्ये ३ वर्ष शिक्षा व २५,०००/—रू दंड न भरल्यास ३० दिवस शिक्षा, कलम ८३ मुदाका मध्ये ०१ वर्ष शिक्षा, कलम १८८ भादंवि मध्ये ०१ महिना कारावासाची शिक्षा श्री. शैलेश कंठे, जेएमएफसी कोर्ट भद्रावती, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्रीमती काकडे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन मपोहवा. निलीमा नलोडे पोस्टे भद्रावती यांनी काम पाहिले.

---